*अत्यंत महत्वाचे*

जा.क्र.शिउसं/प्रशिक्षण-४/सूचनापत्र /पुवि/११-१२/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक- २६।९।११

प्रति,

संस्था सचिव/अध्यक्ष
सर्व अनु./विनाअनु/ कायम विनाअनु अध्यापक विद्यालये,
पुणे विभाग.

विषय -अध्यापक विद्यालयात नियमित प्राचार्य नियुक्ती करणे बाबत

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, विना /कायम विनाअनुदानित अध्यापक विदयालयां मध्ये नियमित प्राचार्याची नियुक्ती केली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रभारी प्राचार्य पदाचे कार्यभार देण्यात आले होते. असे देण्यात आलेले कार्यभाराची मुदत ही ३०/९/२०११ अखेर पूर्ण होत असल्याने सर्व अध्यापक विदयालयांनी नियमित प्राचार्य भरणे संदर्भातील उचित कार्यवाही करावी . व नियमित प्राचार्य पदाचे प्रस्ताव पुढील नियोजित कालावधीत समक्ष मूळ शैक्षणिक कागदपत्रे व अनुभव दाखले तपासून कार्यालयात सादर करावेत.

दि.११/१०/२०११ ---- पुणे जिल्हा शहर ,दि.१२/१०/२०११ ---- पुणे ग्रामीण विभाग
दि.१३/१०/२०११---- सोलापूर जिल्हा ,दि.१४/१०/२०११---- अहमदनगर जिल्हा
नियमित प्राचार्य मान्यता प्रस्तावा सोबत जोडावयाचे कागदपत्रे पुढील प्रमाणे असावेत.

१. जाहीरात मूळ प्रत
२. निवड प्रक्रिया राबविले संदर्भातील उपस्थिती पत्रक
३. सेवक संच .......
४. नियुकती संदर्भातील संस्थेचा ठराव
५. नियुक्ती आदेश अनूसची ड नमून्यातच आवश्यक – कर्मचा-याचे नांव व पत्ता, वेतनश्रेणी ,पद नमूद असणे आवश्यक -
६. रुजू अहवाल (विहित नमून्यात सक्षम अधिकारी यांनी रुजू करुन घेतले असे नमूद करुन स्वाक्षरी करुन दिनांक नमूद करणे आवश्यक आहे )
७. शैक्षणिक कागदपत्रे व व्यावसायिक प्रमाणपत्रे मूळ प्रत तपासणी साठी आवश्यक
८. इतरत्र काम करत नसले संदर्भातील हमी पत्र
९. अनुभव ५ वर्षे पैकी ३ वर्षे डी.एड व इतर २ वर्षे ,मान्यता प्रती व अनुभव दाखल्यासह असणे आवश्यक आहे.

नांव --                                        अनुभव तक्ता --

| अ.क्र. | कॉलेजचे नांव (डी.एड / बी.एड/माध्य/अथवा इतर अनुभव नमूद करणे आवश्यक ) | कॉलेजमधील एकूण सेवा कालावधी दि.....पासून दि ....पर्यत | कॉलेजमधील अनुभव कालावधी वर्षे,महिने,दिवस | वैयक्तिक मान्यता प्रत जोडली आहे / नाही क्र......दि.... | अनुभव प्रमाणपत्र जोडले आहे / नाही दिनांक .... |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१०. या पूर्वी कार्यरत असणारे प्राचार्याचे नांव ,कार्यरत कालावधी नमूद करुन यादी जोडलेली असावी.मान्यता मिळालेली असल्यास मान्यता आदेशही नमूद केलेला असावा.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १.